# Yashoda Girls' Arts & Commerce College, Nagpur

## Department of Economics

## Assignment

## Session: 2021 – 2022

Page No.

Date

Name :- Sejal. R. Sonule

Class :- B.A (VI th Sem)

Sub :- Economic

College Name :- Yashoda Girl's Art's & Commerce College, Nagpur

2021 - 2022

Principal
Yashoda Girls Arts & Commerce
College, Sneh Nagar, Nagpur-15

Dr. M. D. Katre

SEAL

युनिट - 1

Page No.
Date

प्र. १ आर्थिक विकास म्हणजे काय? दारिद्र्याच्या दुष्टचक्रातून अर्थव्यवस्थेला बाहेर काढण्यासाठी तुम्ही कोणते उपाय सुचवाल?

→ आर्थिक विकासाला आजच्या परिस्थितीत सर्वाधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. नव्हे, आर्थिक विकास हा आर्थिक विवेचनाचा केंद्रबिंदू बनलेला आहे. अविकसित आणि अल्पविकसित देशात वर्तमानकाळात आर्थिक विकासाला अनन्यासाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. साधारणपणे विसाव्या शतकाच्या मध्यापासून अर्थशास्त्रांनी आर्थिक विकासाच्या प्रश्नावर आपले लक्ष केंद्रीत केलेले आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर आशिया, दक्षिण अमेरिका व आफ्रिका खंडातील निरनिराळ्या देशांना राजकीय स्वातंत्र्य प्राप्त झाले. त्यानंतर त्यांनी आपला आर्थिक विकास साधण्याचा प्रयत्न केलेला आहे. कारण प्रत्येक देशाने आपले स्वातंत्र्य प्राप्त झाले. त्यानंतर त्यांनी आपला आर्थिक विकास साधण्याचा प्रयत्न केलेला आहे. कारण प्रत्येक देशाने आपले दारिद्र्य दूर करून आर्थिक सुबत्ता निर्माण करणे हे उद्दिष्ठ ठरविविलेले आहे. कारण जगातील श्रीमंत राष्ट्रांनाही आता हे कळून चूकले की एखादा ठिकाणचे दारिद्र्य हे अन्य ठिकाणच्या श्रीमंतीला धोका होऊ शकते. म्हणूनच इंग्लंड,

Page No.
Date 1/5/19

अमेरिका जपान व जर्मनी सारखी श्रीमंत राष्ट्रे ही आता गरीब देशांना आर्थिक मदत देवून त्यांच्या विकासाकडे लक्ष्य पूरवित आहे.

व्याख्या :- किंडल बर्जर या अर्थशास्त्रज्ञाच्या मते, "आर्थिक विकास म्हणजे अधिक उत्पादन आणि ते ज्यामुळे शक्य होते अशा तंत्रिक व संस्थात्मक व्यवस्थेतील बदल होय."

शुपटरची व्याख्या :- "अर्थव्यवस्थेत अंतर्भूत असणाऱ्या अंतर्गत घटकांच्या सहाय्याने स्वयंस्फूर्तपणे घडून येणार आर्थिक बदल म्हणजे आर्थिक विकास होय.

वैशिष्ट्ये :-

अ] विकास एक प्रक्रिया :-
आर्थिक विकास ही एक प्रक्रिया असून तिचा संबंध अर्थव्यवस्थेचा विभिन्न घडून येणाऱ्या बदलांशी आहे जसे -

(1) मागणी पक्षाला प्रभावित करणाऱ्या घटकांत बदल - उदा., लोकसंख्या, लोकांचे उत्पन्न, लोकांच्या आवडी - निवडी इ. सतत बदल होत असतात व ते मागणीला प्रभावित करतात.

(ii) पुरवठ्याला प्रभावित करणाऱ्या घटकातील बदल बचत व गुंतवणुकील होणारे बदल, नवीन साधनांचा शोध उत्पादनाच्या तंत्रात होणारे बदल इ. त्यामूळे उत्पादन व पूरवठ्याचे परिणाम बदलते.

ब] वास्तविक राष्ट्रीय उत्पन्नात वाढ -

(i) मौद्रिक राष्ट्रीय उत्पन्न :- एखाद्या देशात एका वर्षाच्या कालावधीत अंतिम वस्तू व सेवांचे जे उत्पादन होते त्याचे मुद्रेतील मुल्य म्हणजे मौद्रिक राष्ट्रीय उत्पन्न होय.

(ii) वास्तविक राष्ट्रीय उत्पन्न :- देशात एका वर्षात अंतिम वस्तू व सेवांच्या स्वरूपात जे उत्पादन होते त्याला वास्तविक राष्ट्रीय उत्पन्न असे म्हणतात.

:- दरडोई वास्तविक उत्पन्न = $\frac{\text{देशाचे वास्तविक राष्ट्रीय उत्पादन}}{\text{लोकसंख्या}}$

क] विकास प्रक्रिया दीर्घकालीन होय -

आर्थिक विकासाच्या संकल्पनेचा संबंध अल्पकाळाशी नसून दीर्घकाळा- आहे. अल्पकाळात केवळ व्यापारचक्रामुळे देखील राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होवू शकते.

जसे - केवळ २-३ वर्षाच्या काळात राष्ट्रीय उत्पन्नात झालेली वाढ म्हणजे आर्थिक विकास नव्हे. याकरिता मागील २०-२५ वर्षापासून देशाच्या वास्तविक उत्पन्नात सतत वाढ होते असेल तरच त्याला आर्थिक विकास संबोधता येईल.

आर्थिक विकास व आर्थिक वृद्धी यातील साम्य व भेद

| आर्थिक विकास | आर्थिक वृद्धी |
|---|---|
| ① प्रेरित व खंडित प्रक्रिया होय. | ① स्वाभाविक अखंडित व संथ गती प्रक्रिया होय. |
| ② उत्पादनवाढीबरोबरच तांत्रिक व संस्थांमध्ये बदल होत असतात | ② केवळ उत्पादनात वाढ होत असते |
| ③ आर्थिक विकास ही संकल्पना अल्पविकसित देशांना लागू पडते | ③ आर्थिक वृद्धी ही संकल्पना विकसित देशांना लागू पडते. |
| ④ आर्थिक विकासातील वाढ संतुलित स्वरूपाची असते. | ④ आर्थिक वृद्धीत होणारी वाढ ही असंतुलित स्वरूपाची असते |
| ⑤ आर्थिक विकासात जाणीवपूर्वक हेतुपुरस्सर प्रयत्न केले जातात. | ⑤ आर्थिक वृद्धी मात्र सहज प्रवृत्तीमधून घडून येत असते. |

युनिट - 2

प्र.२९ आर्थिक नियोजनाच्या अर्थ स्पष्ट करून विकसनशील देशात आर्थिक नियोजनाची आवश्यकता प्रतिपादन करा.

→ आधुनिक युगास 'नियोजनाचे युग' असे संबोधले जाते. देश विकसित असो व अविकसीत असो, अशा दोन्ही प्रकारच्या अर्थव्यवस्थेत नियोजनाला आर्थिक विकासाचे एक प्रभावी साधन मानले जाते. आज जगाच्या पाठीवर असा कोणताही देश आढळणार नाही की, जेथे नियोजन आंशिक स्वरूपात का होईना अवलंबिले जात नाही.

व्याख्या -

① प्रो. रॉबिन्स - "संपूर्ण आर्थिक जीवनाच नियोजनाची व्यापले आहे. नियोजन करणे म्हणजे विशिष्ट उद्देशाने कार्य करणे, निवड करणे होय. निवड आर्थिक क्रियांचे सार होय. ते पुढे म्हणतात, "आर्थिक नियोजन आपल्याकरिता एक अचूक औषधी आहे. कल्याणकारी राज्याच्या आदर्शांना प्राप्त करण्याकरिता हे एकमात्र साधन आहे."

② " आर्थिक नियोजन ही एक अशी प्रणाली आहे की, ज्यात बाजाराला स्वेच्छापूर्वक कार्य करण्यास स्वातंत्र्य न देता त्याला अशाप्रकारे संघटित केले जाते की, तो

आर्देश बनते "आर्थिक नियोजन म्हणजे निश्चित केलेल्या सामाजिक उद्देशांच्या संदर्भात महत्तम हितासाठी साधनांची जुळवाजुळव व वापर करण्याचा एक मार्ग होय.

नियोजनाची वैशिष्ट्ये

1. नियोजन म्हणजे आर्थिक संघटन स्थापित करणे
2. नियोजनात आर्थिक साधनांचे विवेकपूर्ण संघटन होणे
3. नियोजनाचे उद्देश पूर्ण निर्धारित आणि पूर्णपणे विचारात घेतलेले असतात
4. निर्धारित उद्देशांची प्राप्ती एका निर्धारित काळातच केली जाते
5. साधनांवरील नियंत्रण जवळपास पूर्णपणे सरकार, राज्य ठेवत असते
6. नियोजित अर्थव्यवस्थेत राष्ट्रीय साधनांचे तांत्रिक सामन्वय होत असते
7. आर्थिक नियोजनात आधारावर होते साधनांचे वितरण व प्रयोग प्राथमिकतेच्या आधारावर होत असते.
8. नियोजनाच्या संचालनाकरिता एक सुसंघटित विभाग असतो.

| Page No. | | | |
|---|---|---|---|
| Date | | | |

नियोजनाची आर्थिक उद्दिष्टे

① राष्ट्रीय उत्पन्नात वाढ :- आर्थिक नियोजनाचा मुख्य उद्देश राष्ट्रीय उत्पादनात महत्तम वाढ करणे होय. राष्ट्रीय उत्पादनात वाढल्यास राष्ट्रीय उत्पन्न वाढेल व परिणाम : लोकांचे दरडोई उत्पन्न वाढेल. लोकांचे दरडोई उत्पन्न वाढल्यास त्यांचा उपभोग वाढेल व आर्थिक कल्याणात भर पडेल.

② पूर्ण रोजगार :- लॉर्ड केन्सच्या मते, आर्थिक विकासात रोजगारीच्या पातळीला सर्वाधिक महत्व असते. काही अर्थशास्त्रांच्या मते, आर्थि विकास व पूर्ण रोजगार हे दोन पर्यायी शब्द होत. रोजगारीची पातळी वाढत गेली तर देशाची आर्थिक विकास होवू लागतो. रोजगारीची पातळी व आर्थिक विकास समदिशेने प्रवास करतात.

③ संतुलित विकास - सामान्यत: अर्थव्यवस्थेत असंतुलित विकास होत असल्याचे आढळते. देशात काही क्षेत्र विकसित तर काही उद्योग विकसित तर काही उद्योग मागासलेले आढळतात. औद्योगिकरणाला प्राधान्य दिल्यास उद्योगधंद्याचा विकास होत असतो.

4) लोकांचे सहकार्य - अनेक देशात आर्थिक नियोजनाचे फायदे लोकांना परिचित नसल्यामुळे व आर्थिक नियोजन का करतात हे माहीत नसल्यामुळे त्यांना आर्थिक नियोजनाला पाठिंबा नसतो. अनेक देशात लोकांच्या नियोजनाला विरोध झालेला दिसून येतो.

5) नियोजनानुकूल संस्था - नियोजन यशस्वी होण्यासाठी देशात नियोजनाकूल संस्था अस्तित्वात असणे आवश्यक आहे.

सारांश, विकसनशील अर्थव्यवस्थेत आर्थिक नियोजनाची नितांत गरज असली तरी वरदर्शक अडचणीमुळे अशा देशात नियोजन करणे तितके सोपे नाही.

युनिट - 3

## करांचे वर्गीकरण

वर्तमानकाळात प्रत्येक देशाचे सरकार विविध प्रकारचे कर आकारित असते. कल्याणकारी राज्यात सरकारला विविध प्रकारची कामे पार पाडावी लागतात. देशाच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी शासनावर येऊन पडते. अशा प्रकारची जबाबदारी पार पडताना सरकारला मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागतो.

(१) प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर व्याख्या :-

निरनिराळ्या अर्थशास्त्रज्ञांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करातील भेद स्पष्ट केला आहे. मध्युगीन कालापासून करांचे वर्गीकरण प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर अशा दोन भागात करण्यात आले आहे.

प्रो. बुलक यांनी आपल्या ग्रंथात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांच्या व्याख्या दिल्या आहेत त्यानुसार उत्पादनावर लावलेला कर प्रत्यक्ष आणि उपभोगावर लावेला अप्रत्यक्ष कर होय.

Page No.
Date

## प्रत्यक्ष करांचे गुण -

(1) काटकसर - प्रत्यक्ष करामध्ये आर्थिकतेचे किंवा काटकसरीचे तत्व दिसून येते. प्रत्यक्ष कर वसूल करण्याचा खर्च तुलनात्मक दृष्ट्या कमी येतो. ते सरकारी अधिकारी लहान संपतीचे व उत्पन्नाचे करनिर्धारण करतात. तेच अधिकारी मोठ्या संपतीचे व जास्त उत्पन्न असणाऱ्याचे कर-निर्धार करतात.

(2) निश्चितता - ॲडम स्मिथने आर्थिकता व अनिश्चितता या तत्वावर विशेष भर दिला आहे. प्रयक्ष करामध्ये निश्चितता हे गुणधर्म असतात. करदात्याला किती कर द्यावयाचा केव्हा द्यावयाचा कराचे दर काय इत्यादीबाबत निश्चित माहिती असते. तसेच प्रत्यक्ष करापासून सरकारला किती उत्पन्न मिळेल याचा आगाऊ अंदाज होते आणि त्यानुसार आपल्या खर्चाची तरतूद करता येतो.

3) समता - प्रत्यक्ष कर हे न्याय असतात तसे ते समता तत्वाची प्रतिस्थापना करतात. कारण हे कर पुरोगामी स्वरूपाचे असतात. या कराचा भार गरिबांच्या तुलनेत श्रीमंता अधिक पडतो आणि ते अपेक्षितही असते.

③ कर टाळणे - प्रत्यक्ष कर हा व्यक्तीच्या प्रामाणिकपणावर आकारला जातो असे म्हणतात. तेव्हा व्यक्ती अप्रामाणिक असेल तर प्रत्यक्ष कर टाळण्यासाठी ती सरकारला खोटी माहिती देते किंवा सरकारपासून काही माहिती लपवून ठेवते.

④ अन्यायाची शक्यता - प्रत्यक्षामध्ये लोकांच्या उत्पन्नाचे व संपत्तीचे बिनचूक मोजमाप करून करनिर्धारण करणे कठीण असते. त्यामुळे काही करदात्यांवर अन्याय होण्याची शक्यता असते.

⑤ लघू उत्पन्न गटाला सवलत - करारोपणामध्ये केवळ प्रत्यक्ष कराचाच उपयोग केला तर लघू उत्पन्न गट करापासून मुक्त राहील.

CAL

Page No.
Date

अप्रत्यक्ष करांचे गुण

1) सुविधाजनक -
अप्रत्यक्ष कर हे सुविधाजनक असतात. हे कर एकाच हप्त्यामध्ये धावयाचे नसतात; तर वेळोवेळी आणि लहान लहान रकमेमध्ये द्यावे लागतात. वस्तूच्या किंवा सेवांच्या किंमतीमध्येच अप्रत्यक्ष कर समाविष्ट झालेले असतात.

2) लवचिकता :-
अप्रत्यक्ष करामध्ये लवचिकता हा गुणधर्म आढळून येतो. सरकाला वाटेल तेव्हा सरकार या करामध्ये वाढ करू शकते त्यामुळे अर्थातच सरकारी उत्पन्नात भर पडते.

3) कर टाळता येत नाही :-
करदाता अप्रत्यक्ष कर टाळू शकत नाही. कारण हे कर वस्तूंच्या किंमतीमध्ये समाविष्ट झालेले असतात. वस्तू खरेदी करतानाच करही द्यावा लागतो.

Page No.
Date

अप्रत्यक्ष करांचे दोष -

① प्रतिगामी स्वरूप - अप्रत्यक्ष कर हे श्रीमंतांच्या तुलनेत गरिबांवर अधिक करभार टाकतात. हे कर प्रतिगामी स्वरूपाचे असतात. वास्तविक पाहता करपद्धती पुरोगामि स्वरूपाची हवी.

② प्रशासकीय खर्च - अप्रत्यक्ष कराच्या वसूलीच्या खर्च जास्त येतो. त्यासाठी फार मोठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज ठेवावी लागतो. कराचे निर्धारण व वसूली यासाठी मोठा सरकारी कर्मचारी वर्ग हवा असतो.

③ बचतीवर विपरीत परिणाम - अप्रत्यक्ष कर बचतीवर विपरित परिणाम घडवून आणतात. हे कर किंमतीमध्ये समाविष्ट झालेले असतात. त्यामुळे आवश्यक वस्तूच्या खरेदीसाठी लोकांना जास्त खर्च करावा लागतो.

④ नागरिक जागरूकता - अप्रत्यक्ष कराची वसूली सामान्य: उत्पादक व्यापारी अशाप्रकारच्या मध्यस्थ वर्गाकडून केली जाते. त्यांच्यावर अशा कराचा प्रत्यक्ष भार पडत नसतो. अप्रत्यक्ष कर एजण भरतो आणि त्याचा भार मात्र दुसऱ्यावर पडत असतो.

युनिट - ४

## जागतिक व्यापार संघटना (WTO)

गेल्या अनेक वर्षात ज्या मुद्यावर जास्त जास्त वाद झाला तो म्हणजे WTO चा विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्थेवर आणि आर्थिक धोरणावर कोणता परिणाम होणार आहे ? WTO चे समर्थक आणि विकसित देशांचे प्रतिनिधी WTO च्या सामान्य लाभांचे अवास्तव चित्र उभे करतात. आंतरराष्ट्रीय व्यापारात अनिर्बंध वाढ होईल. त्यामुळे राष्ट्रांचा उत्पन्नाची पातळी उंचवितील. उदारीकरणाचा वेग वाढेल, बाजार शक्यतांचा विस्तार होईल, त्यामुळे राष्ट्रांच्या उत्पन्नाची पातळी उंचावले, व्यापारी संबंधी अनिश्चिता कमी होईल. भारत सरकारला देखील असेच परिणाम होतील असे वाटते.

(1) WTO चा सदस्य बनल्यानंतर भारताने ६6% जकात मार्गावरील महत्तम मर्यादा जाहिर केल्या. उरूग्वे फेरीपूर्वी फक्त ६% जकात मार्गावर महत्तम मर्यादा होती. बिगर कृषी उत्पादनासाठी काही अपवाद वगळता निर्मित वस्तुंवर जास्तीत जास्त ४०% मुल्याधारीत कर आणि मध्यम वस्तू यंत्रसामुग्री आणि उपकरणांवर २५% कर निर्धारित करण्यात आले

Page No.
Date

(2) भारत सरकारने १९९० मध्ये WTO ला शोधनशेषाच्या आधारे आयातीवर संख्यात्म निर्बंध स्तरावर २६/४ जकात मार्गासाठी अधिसूचित केले होते. भारताच्या शोधनशेवर प्रगतीचा विचार करता WTO ने भारत सरकारला हे निर्बंध टप्पाटप्प्याने काढून टाकण्यास सांगितले आहे. आपल्या व्यापारात मुख्य सहभागी राष्ट्रांशी विचार विनिमय करून भारत सरकारने ही प्रक्रिया १९९६ पासून ६ वर्षात म्हणजेच 2003 पर्यंत पूर्ण करण्याचे ठरविले.

(3) व्यापारसंबंधी बौद्धिक संपत्ती अधिकारात पेटंट कॉपीराईट्स संरक्षणाची व्यवस्था आहे या संदर्भात अमेरिका आणि युरोपियन समुदायाने परवानगी WTO या संघर्ष निवारण यंत्रणेकडे भारताविरुद्ध तक्रार केली की, भारताने आपल्या पेटंट कायद्या योग्य बदल केलेले नाहीत. या संदर्भात आपली वचनबद्धता पूर्ण करण्याच्या दृष्टीने भारत सरकारने संसदेत पेटंट दुरुस्ती अधिनियम सादर केला. तो मार्च १९९९ मध्ये पास झाला.

Page No.
Date

अ) GATT चे अंदाज अवास्त आहेत.
ब) भारताच्या ह्रासमान निर्यातीच्या प्रवृत्तींचा विचार करता 0.5 % वरून निर्यातीत 1 % होणे कठीण आहे.
क) जागतिक व्यापारातील वाढ व्यापार शिथिलीकरणाचा अवलंबून नसून ती अनेक घटकांवर अवलंबून नसते.

② बहुतंतु कराराचा त्याग :- 2005 पर्यंत बहुतंतू कराराचा त्याग करावयाचा आहे. त्यामुळे भारताला निर्यातीने फायदे मिळतील. भारताची कापड व वस्त्रोद्योगातील निर्यात वाढेल. या कराराचा त्याग करण्यासाठी विकसनशिल राष्ट्रांना 15 वर्षांना मुदत दिली आहे. विकसित देशातील 49 % पर्यातांचा कोटा 2005 मध्ये काढला जाईल.

Principal
Yashoda Girls Arts & Commerce
College, Sneh Nagar, Nagpur-15

SEAL